## ग्रामिण भागातील छोटया उद्योग घटकांना जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना

सदर योजना राज्य शासनाची योजना असून महाराष्ट्रात जिल्हास्तरावर जिल्हा उद्योग केंद्र कार्यालयाकडून राबविण्यात येते.

**योजनेचा उध्देश -**

निमशहरी व ग्रामीण भागातील अतीलहान नवीन उद्योगांना बीज भांडवल उभारण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करणे हा या योजनेचा उध्देश आहे. ज्या उद्योगांची यंत्रसामुग्रीमध्ये स्थिर भांडवली गुंतवणुक २ लाख रुपयांपर्यंन्त आहे अशाच उद्योगांना या योजनेखाली अर्थसहाय्य मिळू शकेल. तसेच सध्या अस्तित्वात असणा-या छोटया उद्योगांस विस्तारीकरणास या योजनेखाली अर्थसहाय्य मिळू शकेल. मात्र सद्याची यंत्रसामुग्रीतील गुंतवणुक व विस्तारीकरणासाठी लागणा-या यंत्रसामुग्रीच्या किंमतीसह २ लाख रुपयापेक्षा कमी असली पाहिजे. ही योजना एक लाखापर्यंन्त लोकसंख्या असलेल्या व १० लाख लोकवस्तीच्या शहराच्या बाहेर १५ कि.मी.पेक्षा अधिक अंतरावरील गावांना लागू आहे.

**अर्थसहाय्याचे स्वरुप व मर्यादा**

यंत्रसामुग्रीतील गुंतवणुक २.०० लाख रुपयांपर्यंन्त असलेल्या लहान उद्योगांना एकूण खर्चाच्या २० टक्के अगर कमाल ४०,०००/- रुपयांपर्यंन्त बीज भांडवल कर्ज मिळू शकेल. मागासवर्गिय (अनुसुचित जाती/जमाती) उद्योजकाला स्थिर मालमत्तेच्या (यंत्रसामुग्रीतील गुंतवणुकीच्या) ३० टक्के कमाल ६००००/- रुपयांपर्यंन्त बीज भांडवल मिळू शकेल. हे अर्थसहाय्य ४ टक्के सवलतीच्या दराने कर्ज स्वरुपात आहे.

सुरुवातीचा खर्च (Preoperative Expenses) ३ महिन्यांकरीता लागणारे खेळते भांडवल व यंत्रसामुग्रीवरील खर्च या तिनही बाबींवरील अवधित (जो लवकर होईल तो) हया बीज भांडवलाची परत फेड करणेची आहे.

बीज भांडवल रुपाने देण्यात येणा-या कर्जावर अल्प दराने (४ टक्के) व्याज आकारले जाते.

या योजनेखाली वय व शिक्षणाची अट नाही.